# टीसीआयची तिस–या तिमाहीत दमदार कामगिरी

**पुणे :** ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (टीसीआय) या भारतातील आघाडीच्या एकात्मिक पुरवठा साखळी व लॉजिस्टिक्स सोल्युशन्स प्रोवायडर कंपनीने आज ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिसऱ्या तिमाहीचे वित्तीय निकाल जाहीर केले.टीसीआयने आर्थिक वर्षाच्या तिस–या तिमाहीत संचालनातून ७५९ कोटी रु उत्पन्न मिळवले आहे ज्यात मागील वर्षाच्या तुलनेत ६.२% वाढ झाली आहे. कंपनीचा कर पश्चात नफा ७८ कोटी रुपये झाला असून आर्थिक वर्ष २०२१मधील तिसऱ्या तिमाहीतील ४० कोटी रुपयांची तुलना करता यात ९४% वाढ झाली आहे.कंपनीचे ईबीटीडीए आर्थिक वर्ष २०२१च्या तिसऱ्या तिमाहीतील ८४ कोटी रुपयांच्या तुलनेत या तिमाहीत ११४ कोटी रुपये झाले आहे. कंपनीचे ईबीआयटीडीए मार्जिन १४.९ टक्के झाले आहे जे आर्थिक वर्ष २०२१च्या तिसऱ्या तिमाहीत ११.६ टक्के होते.टीसीआयने या आर्थिक वर्षात संचालनातून २३५९ कोटी रु उत्पन्न मिळवले आहे ज्यात मागील वर्षाच्या तुलनेत २३.५% वाढ झाली आहे. कंपनीचा कर पश्चात नफा आर्थिक वर्ष २०२१च्या पहिल्या ९ महिन्यांत ८५ कोटी रुपये होता ज्यात १४३ टक्क्यांनी वाढ होऊन या आर्थिक वर्षात २०६ कोटी रुपये झाला आहे.टीसीआयचे व्यवस्थापकीय संचालक श्री. विनीत अगरवाल, म्हणाले, चालू आर्थिक वर्षातील तिसरी तिमाही आणि ९ महिने प्रोत्साहक आहेत आणि देशातील सकारात्मक आर्थिक हालचालींशी सुसंगत आहेत. सर्व सेवा उत्पादनांनी टॉप–लाइन व बॉटम–लाइन अशा दोन्ही आघाड्यांवर चांगली कामगिरी केली आहे. टीसीआयने बहुमार्गीय व्यवसायातील गुंतवणूक कायम ठेवली आहे आणि जीएचजी उत्सर्जनाच्या कपातीकडे कल राखल्याने आमच्या क्लाएंट्सचे सकारात्मक ईएसजी पालन वाढले आहे. कॉर्पोरेट बोर्ड रूम्समधील लॉजिस्टिक्सचे महत्त्व, सरकारच्या संरचनेतील गुंतवणुका आणि आत्मनिर्भर भारत या सर्व बाबी टीसीआयसारख्या बहुमार्गीय लॉजिस्टिक्स कंपनीसाठी उत्तम ठरत आहेत.